# दैनिक महा मेट्रो

www.mahametronews.in

वर्ष ४ थे : अंक : १४ पुणे, बुधवार, ३ सप्टेंबर २०२५ | पाने : ४ किंमत : ३.००

RNI NO.MAHMAR2022/87390

VOL NO.04. ISSUE : 14 Pune, Wednesday, 3 September 2025 | Pages : 4 PRICE : 3.00






# मनोज जरांगे पाटील यांनी अध्यादेश स्विकारला

## आंदोलकांकडून गुलाल उधळून जल्लोष; सातारा गॅझेट अंमलबजावणीसाठी पंधरा दिवसांचा अवधी

**मुंबई । प्रतिनिधी**

मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणाला मोठं यश मिळालं असून राज्य सरकारने त्यांच्या जवळपास सर्व मागण्या मान्य केल्या आहेत. उपसमितीच्या वतीने करण्यात आलेल्या शिफारशी या योग्य असल्याची खात्री अभ्यासकांनी दिली आहे. यानंतर मराठा आंदोलकांकडून गुलाल उधळून जल्लोष केला.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे हे गेल्या पाच दिवसांपासून मुंबईतील आझाद मैदानात आंदोलनासाठी बसले होते. त्यावर राधाकृष्ण विखे पाटलांच्या अध्यक्षतेखालील मराठा उपसमितीने जरांगे पाटील यांची भेट घेतली. मनोज जरागे पाटील यांनी सरकारचा अध्यादेश ( जीआर ) स्वीकारला. त्यानंतर मराठा आंदोलकांकडून गुलाल उधळून जल्लोष केला.

**अभ्यासकांनी होकार दिला**

मराठा उपसमितीने ज्या मागण्या शिफारशी केल्या आहेत त्यावर मराठा अभ्यासकांनी आणि वकिलांनी चर्चा केली. त्यानंतर उपसमितीच्या शिफारशी योग्य असल्याचं अभ्यासकांनी सांगितलं. त्यानुसार उपसमितीकडून आता एका तासात त्या संबंधी जीआर काढणार असल्याचं सांगण्यात आलं.

राज्य सरकारने आपल्या मागण्यांसबंधी जीआर काढावा, त्यानंतर एका तासात मुंबई रिकामी करतो असा शब्द मनोज जरांगे यांनी दिला होता. मनोज जरांगे यांच्या आंदोलनामुळे मुंबईमध्ये आंदोलकांची मोठी गर्दी झाली होती. त्यामुळे ऐन गणेशोत्सवात मुंबईची गती काहीशी मंदावल्याचं दिसून आलं. त्यावर जीआर आल्यानंतर आपण आंदोलन मागे घेऊ, एका तासात मुंबई रिकामी करू असं जरांगे म्हणाले होते

**मराठा उपसमितीच्या शिफारशी काय?**

हैदराबाद गॅझेटची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी अशी मनोज जरांगे यांची मागणी होती. त्याला शासनाने मान्यता दिली आहे. गावातील कुळातील नात्यातील व्यक्तींना चौकशी करुन कुणबी जातीचे प्रमाणपत्र

पान ३ वर...

### मनोज जरांगेंच्या मागण्या मान्य

**मराठा आरक्षणासाठी हैद्राबाद आणि सातारा गॅझेटची अंमलबजावणी करावी अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली होती. त्यावर उपसमितीने मोठा निर्णय घेतला. हैद्रबाद गॅझेट मान्य करत असून त्याचा तातडीने जीआर काढण्याची तयारी उपसमितीने दर्शवली. त्यामुळे नात्यातील, कुळातील आणि गावातील लोकांची चौकशी करून कुणबी सर्टिफिकेट दिले जाणार आहे. सातारा गॅझेटच्या अंमलबजावणीसाठी पंधरा दिवसांचा अवधी उपसमितीने मागितला आहे. औंध आणि सातारा गॅझेटमधील तरतुदी किचकट असल्याने हा वेळ मागितला आहे.**

## महत्वाचे...

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिली प्रतिक्रिया

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या शिष्टमंडळाच्या उपस्थितीत मनोज जरांगे पाटील यांनी आपलं उपोषण सोडलं आहे. उपोषणाचा पाचवा दिवस होता. उपोषण सोडल्यानंतर गणरायाची आरती करण्यात आली व राष्ट्रगीत म्हणत या उपोषणाची सांगता करण्यात आली. यावेळी राज्यभरातील मराठा आंदोलकांनी जल्लोष साजरा केला. आझाद मैदानावर जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. आता यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिली प्रतिक्रिया दिली. मंत्रिमंडळ उपसमितीनं चांगलं काम केलं: ‘‘हैदराबाद गॅझेट लागू करण्याकरता आमची सुरुवातीपासून तयारी होती. पण, त्या ठिकाणी मनोज जरांगे पाटील यांची मागणी होती सरसकटची. त्याच्यामध्ये कायदेशीर अडचणी होत्या. हायकोर्टाची व सुप्रीम कोर्टाचे निर्णय हे बघता अशा प्रकारे सरसकट करणे शक्य नव्हतं आणि विशेषता वस्तुस्थिती लोकांच्याही लक्षात आणून देण्यात आली. मंत्रिमंडळ उपसमितीनं जरांगे पाटील यांच्या टीमला लक्षात आणून दिलं की, आपल्या कायद्याप्रमाणे आणि देशाच्या संविधानाप्रमाणे आरक्षण हे समूहाला नसतं तर ते व्यक्तीला मिळत असतं आणि त्या व्यक्तीने ते क्लेम करायचा असतो आणि म्हणूनच अशा प्रकारे सरसकट करता येणार नाही. ते कायद्याच्या पाठीवर टिकणार नाही आणि जरांगे यांनी देखील भूमिका समजून घेतली,‘‘ अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

### १४ व्या मजल्यावरुन पडून पेंटींग कामगाराचा मृत्यु

**पुणे । प्रतिनिधी**

इमारतीचे पेंटींगचे काम करताना १४ व्या मजल्यावरुन तोल जाऊन खाली पडून कामगाराचा मृत्यु झाला. कामगाराला सुरक्षेची साधने न पुरविल्याने त्याच्या मृत्युस जबाबदार ठरवून सिंहगड रोड पोलिसांनी पेंटींग ठेकेदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मोबुद मारुफ हसन (वय ३४, रा. गणेशपूर, ता. तुळशीपूर, महाराजगंज, जि.बलरामपूर, उत्तर प्रदेश) असे मृत्यु पावलेल्या कामगाराचे नाव आहे. याबाबत इसरार करीमुल्ला खान (वय २८, रा. स्कायडेल साईट लेबर कॅम्प, विठ्ठलवाडी, सिंहगड रोड) यांनी सिंहगड रोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी अतिकुर रहेमान खान (वय ३७, रा. नांदेडसिटी, मुळ रा. पुरेबक्स छटेडी, महाराजगंज, ता. तुळशीपूर, जि. बलरामपूर, उत्तरप्रदेश) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. ही घटना विठ्ठलवाडी येथील स्कायडेल डी विंग, क्लब हाऊस फ्लोअर येथे ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता घडली. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्कायडेल डी विंग या इमारतीच्या पेंटींगचे काम अतिकुर रहेमान खान याने घेतले होते. त्याच्याकडे मोबुद हसन व इतर पेंटीगचे काम करण्यासाठी काम करीत होते. पेंटींग काम करताना त्यांना हेल्मेट, वायर रोप आदी आवश्यक सुरक्षा साधने पुरविणे अत्यावश्यक होते. ती सुरक्षा साधने न पुरविता त्यांना इमारतीचे पेंटीग करायला लावले होते.

## समतेचा वडापाव: अखिल जनवाडी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा प्रेरणादायी जिवंत देखावा




**पुणे । प्रतिनिधी**

अखिल जनवाडी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यंदा६३ वे वर्षे साजरे करत आहे. सामाजिक सांगोपांगतेचा आदर्श ठेवून कार्यरत आहे. मागील २० वर्षापासून दरवर्षी मंडळ सामाजिक विषयावर भाहया करणारे देखावे सादर करत आहे. अध्यक्ष नरेश राजू कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली, मंडळाने या वर्षी एक अतिशय विशेष संदेशात्मक उपक्रम सादर केला. मी आता प्रसाद रुपी समतेचा

पान ३ वर...

## मोशी खाण येथील गणेश विसर्जन स्थळाची अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्याकडून पाहणी...



**पुणे । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालयामार्फत एकत्रीत केलेल्या गणेश मूर्तींचे मोशी खाण येथील विसर्जन ठिकाणी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी भेट देऊन पाहणी केली. गणेश विसर्जन काळात कोणतीही गैरसोय होऊ नये, तसेच विसर्जन सोहळा सुरळीत आणि सुरक्षित पार पडावा, यासाठी आवश्यक त्या सर्व

पान ३ वर...

## वर्षभर उत्सवात अल्पवयीन कार्यकर्त्यांना ‘व्यसनाचा’ डोस!

### सर्वच राजकीय पक्षांकडून वर्गणीच्या नावाखाली मंडळांना पैशाची खैरात

**वस्त्यांमधील अल्पवयीन मुले व्यसनाच्या आहारी जाण्यासाठी जसे पालक जबाबदार आहेत. त्याच प्रमाणे राजकीय पुढारी, पोलीस यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग असल्याचे दिसून येते. वर्षभर चालणारे विविध उत्सव, थोर पुरूषांची जयंती एवढेच नसून ३१ डिसेंबर, धुळवड, आषाढी (गटारी) अमावास्या, निवडणुका, कार्यकर्त्यांपासून नेत्यांचे वाढदिवस अशा कार्यक्रमांना स्थानिक राजकीय पुढारी आपल्या कार्यकर्त्यांना वर्गणीच्या नावाखाली लक्षावधी रूपये वाटतात. या पैशातून डीजे आणि मद्यपानाचा महापूर वाहतो. यातूनच येणारी नवीन पिढी व्यसनाधिनतेच्या मार्गावर पाऊल ठेवते. तर हातभट्टीच्या दारूपासून ते गुटखा, गांजा अशा विविध अमली पदार्थांच्या वितरणाला पोलीसांचा वरदहस्त असतो. वस्त्यांमधील व्यसनाधिनतेची कीड काही निघता निघेना अशी स्थिती असल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.**

**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा, विधानसभा असो कि स्थानिक महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका असल्यास सर्वच राजकीय पक्षातील नेत्यांचा वस्त्यांमधील मतांवर ‘डोळा’ असतो. त्यामुळे हे नेते दरवर्षी होणाऱ्या विविध उत्सव, सण, महापुरूषांचे वाढदिवस, उरूस यासाठी वर्गणीच्या नावाखाली मोठी देणगी देतात. एवढेच नव्हे तर स्थानिक कार्यकर्त्यांपासून ते राष्ट्रीय नेत्यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी सुद्धा इच्छुक उमेदवार वस्तीपातळीवर पैशाचे वाटप करतात. सध्या शहरात तर वर्गणी देण्यासाठी जणू स्पर्धाच लागली आहे. त्यामुळे स्थानिक मंडळ व कार्यकर्त्यांसह वस्त्यांमधील अल्पवयीन मुले वर्गणी मागण्यासाठी आघाडीवर असतात. त्यांना वर्गणी देण्यास नेताही मागे पुढे पाहत नाही. कारण तो उद्याचा त्याचा मतदारराजा असतो. या वर्गणीचा हिशोब कोणी मागत नाही कि धर्मदाय



आयुक्त कार्यालयाला सादर करण्याचे बंधन नसते. त्यामुळे अनेकजण या पैशातून आपली ‘तल्लफ’ भागवतात.

शहरातील वस्त्यांमध्ये वर्षभर उत्सव, सण साजरे होत असतात. या सण किंवा उत्सवात हमखास डीजे वाजणार आणि डिजे आला कि मद्य आले. त्यानंतर मद्य पिऊन डिजेच्या तालावर ही अल्पवयीन मुले बेभान होऊन नृत्य करतात. अशी पीढी घडविण्यामध्ये राजकीय पक्षाचे नेते सध्या आघाडीवर आहेत. हीच मुले त्यांचा झेंडा खांद्यावर घेऊन

पान ३ वर...

## मराठा आंदोलनात घडला घुसखोरीचा धक्कादायक प्रकार

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आझाद मैदानात सुरू असलेल्या ऐतिहासिक आंदोलनात सोमवारी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मध्य प्रदेशातून आलेल्या एका हिंदी भाषिक तरुणाला मराठा बांधवांनी रंगेहात पकडलं. या तरुणाने गळ्यात भगव्या रंगाचं उपरणं घातलं होतं आणि आंदोलकांमध्ये संशयास्पद हालचाली करत फिरत असल्याने उपस्थित मराठा बांधवांना त्याच्यावर संशय आला. लगेचच त्याची चौकशी करण्यात आली असता, तो परप्रांतीय असल्याचं स्पष्ट झालं. त्यामुळे संतापलेल्या मराठा बांधवांनी त्याला थेट पोलिसांच्या स्वाधीन केलं.

मराठा आंदोलकांनी गंभीर आरोप केला आहे की, अशा परप्रांतीय लोकांना मुद्दाम आंदोलनात घुसवून अनुचित प्रकार घडवून



आणण्याचा डाव रचला जात आहे. आंदोलनाची बदनामी करण्यासाठी बाहेरून लोकांना आणलं जात असल्याचीही चर्चा आंदोलकांमध्ये रंगली. या तरुणाचा व्हिडिओही सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत असून मराठा समाजात संतापाची लाट उसळली आहे.

दरम्यान, एक मराठा लाख मराठा; असा घोष देत राज्यभरातून लाखो मराठा बांधव मुंबईत दाखल झाले

पान ३ वर...

संपादकीय....



# कैद्यांची लाईफ स्टाईल दारिद्र्यरेषेच्यावर!

केंद्र सरकारने कुटुंबाच्या दारिद्र रेषेच्या उत्पन्नाची अट ठेवली आहे. एखाद्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ५८ हजाराच्या आत असेल तर ते कुटुंब दारिद्र्यरेषेच्या आत ( बीपीएल) समजले जाते. जर त्याचे उत्पन्न ५९ हजार झाले तरी ते कुटुंब दारिद्र्यरेषेच्यावर ( एपीएल) गणले जाते. या निकषांचा विचार केला तर एखाद्या कैद्याला कारागृहात किती खर्च होतो याचा हिशोब केला तर तो ६२ हजारापेक्षा अधिक होतो. एखादा कैदी कारागृहात काम करीत असल्यास त्याचे उत्पन्न वीस ते पंचवीस हजाराच्या घरात जाते. यासह दरमहा काही कैद्यांना मनिऑर्डर सुद्धा नियमित येत असते. यासर्वांचा विचार केला तर एका कैद्याचा कारागृहातील खर्च लाखाच्यावर जातो. याचा अर्थ कैद्याची कारागृहातील लाइफ स्टाईल दारिद्र्यरेषेच्यावरील कुटुंबापेक्षा कमी नसते.

केंद्र सरकारने देशातील एखाद्या कुटुंबाचे उत्पन्न ५८ हजारापेक्षा कमी असेल तर त्या कुटुंबाला दारिद्र्यरेषेखाली (बीपीएल) म्हणून समजले जाते. कुटुंबाच्या उत्पन्नात हजार ते दोन हजाराची भर पडली तर ते कुटुंब दारिद्र्यरेषेच्या वर येते. हे उत्पन्न हास्यापद असले तरी सरकारचे निकष आता तरी बदलता येणार नाही. त्याच वेळी राज्यातील कारागृहातील एका कैद्यावर सरकारचा होणारा खर्च हा दारिद्र्यरेषेच्या वरील कुटुंबाच्या उत्पन्नापेक्षा अधिक असल्याचे वास्तव आहे. कारागृहात कैद्यांना सकाळी दुध, अंडी, चहा, न्याहरी, सकाळी दहा वाजता व चार वाजता जेवण दिले जाते याचा खर्च प्रत्येकी कैदी प्रमाणे १३० ते १४० रूपये होतो. यासह ते वापरत असलेले पाणी व वीजेचा वापर याचा विचार केला तर तो खर्च तीस ते चाळीस रूपयां पर्यंत जातो. याचा अर्थ प्रत्येक कैद्याला दिवसाला १६० ते १७० रुपये खर्च येतो. हा खर्च सहाजिकच साठ हजारापेक्षा अधिक होतो.

कारागृहात काम करणाऱ्या कैद्यांना कुशल ( ७२ रुपये), अर्धकुशल ( ६५ रूपये) तर अकुशल ( ५५ रूपये) पगार दिला जातो. या पगाराचा विचार केला तर वर्षभरात कैदी वीस हजारापेक्षा अधिक रूपये कमवतात. त्यानंतर अनेक कैद्यांना दरमहा त्यांचे नातेवाईक व मित्रमंडळी नियमित मनीऑर्डर करतात. या सर्व पैशांची गोळाबेरीज केली तर एक कैदी वर्षाला एक लाखा पेक्षा अधिक खर्च करू शकतात. याचा अर्थ त्यांची लाइफ स्टाईल ही दारिद्र रेषेच्या वरील कुटुंबा सारखी असते. त्यामुळे बाहेरच्या जगापेक्षा कारागृहच बरे असे कैद्यांना वाटत नसले तर नवल म्हणावे लागेल.

**एका मनोरुग्णावर दैनंदिन तीनशे रूपया पेक्षा अधिक खर्च**


येरवडा मनोरूग्णालयातील एका मनोरुग्णांचा दैनंदिन खर्च हा तीनशे रूपया पेक्षा अधिक आहे. रुग्णाला अधिक पौष्टीक अन्नपदार्थ, औषधोपचारांसह विविध उपचार पद्धती, मनोविकार तज्ज्ञांपासून ते त्यांची काळजी घेणारे परिचर व परिचारिका, समाजसेवक असा शेकडोजण कर्मचारी वर्ग असल्यामुळे त्यांचा दैनंदिन खर्च हा तीनशे रूपया पेक्षा अधिक आहे.

**भिक्षेकऱ्यांचा दैनंदिन खर्च ४२ रूपये**

येरवड्यातील फुलेनगर येथील भिक्षेकरी स्विकार केंद्रात शहरातील भिक्षेकऱ्यांना आणून ठेवले जाते. भिक्षा मागणे हा गुन्हा आहे. त्यामुळे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी पोलीसांच्या मदतीने शहरातील भिक्षेकऱ्यांना स्विकार केंद्रात काही दिवस ठेवते. तेथे प्रत्येक भिक्षेकऱ्यांचा दैनंदिन खर्च हा ४२ रुपये आहे. तर त्यांना दिवसाला पाच रूपये पगार दिला जातो.

निवासी आश्रमशाळेतील मुलांचा दैनिक खर्च ७५ रूपये

राज्य सरकार निवासी आश्रमशाळेतील मुलांच्या दैनंदिन खर्चासाठी ७५ रूपये देते. यामध्ये दोन वेळचा नास्ता , दोन वेळचे जेवण, शालेय साहित्य, कपडे, साबण, तेल, पेस्ट आदी वस्तू पुरविण्यासाठी प्रति महा २२०० रूपये देते. या महागाई निर्देशांकानुसार हे पैसे मुलांना कमी पडतात, असे संस्थांचालकांचे म्हणणे आहे. त्यामुळे एकंदरच हा हिशोब कसा लावायचा हे सरकारलाच माहित.



# इतिहास, भूगोल आणि प्रेरणादायी वारसा : किल्ले शिवनेरी

सह्याद्रीच्या हिरव्यागार कुशीत वसलेला शिवनेरी किल्ला केवळ एक किल्ला नाही, तर महाराष्ट्राच्या इतिहासातील अद्वितीय स्मृतीचिन्ह आहे. जुन्नर शहराच्या उत्तरेला उभा असलेला हा गड जणू त्या भूमीचा रक्षक बनून शतकानुशतके उभा आहे. इथे प्रत्येक दगड, प्रत्येक कडा, प्रत्येक तट इतिहासाची गाथा सांगतो.

इ.स. सहाव्या शतकापासून अस्तित्वात असलेला शिवनेरी किल्ला महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महत्त्वाचा साक्षीदार आहे. सुरुवातीला हा किल्ला एक महत्त्वाचा लष्करी ठाणे म्हणून उभारण्यात आला होता. अनेक राजवटींनी या किल्ल्यावर आपले वर्चस्व गाजवले. मात्र, भोसले घराण्याच्या काळात याला खऱ्या अर्थाने ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले.

१५९५ मध्ये मालोजीराजे भोसले यांच्या ताब्यात हा गड आला. याच ठिकाणी, १९ फेब्रुवारी १६३० रोजी, छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला. या किल्ल्याच्या साक्षीने त्यांचे बालपण घडले. ज्या किल्ल्यावर एका युगपुरुषाने पहिला श्वास घेतला, तो किल्ला स्वाभाविकच असामान्य तेज आणि पावित्र्य लाभलेला ठरतो. बालवयातच त्यांनी राज्यकारभार, युद्धकला आणि मुत्सद्देगिरीचे धडे येथेच गिरवले.

शिवनेरीचा निसर्गसंपन्न परिसर, मजबूत तटबंदी आणि सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून केलेली रचना पाहिल्यास शहाजी राजांनी हा किल्ला निवडण्यामागचे महत्त्व लक्षात येते. शिवनेरीवर झालेल्या संस्कारांमुळेच शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेची प्रेरणा मिळाली.

शिवनेरीचे महत्त्व केवळ त्याच्या संरक्षणात्मक रचनेत नाही तर त्याच्या सामरिक स्थानातही दडलेले आहे. नाणेघाट आणि माळशेज घाट या प्राचीन व्यापारी मार्गांवर नजर ठेवणाऱ्या या किल्ल्यामुळे येथील सत्ताधाऱ्यांना व्यापारावर नियंत्रण ठेवणे सहज शक्य होत असे. सातवाहनांच्या काळापासून या घाटखिंडी पश्चिम किनाऱ्यावरील समृद्ध बंदरांना देशाच्या आतील प्रदेशाशी जोडत होत्या. त्यामुळे या परिसरावर नियंत्रण म्हणजे व्यापार, सत्ता आणि सामरिक बळ या तिन्ही गोष्टींवर पकड मिळविणे होय. म्हणूनच, पुढे कुठलाही राजवंश आला तरी शिवनेरीवर नियंत्रण मिळवणे हे त्यांच्यासाठी अनिवार्यच होते.

शिवनेरीची रचना ही युद्धकौशल्याचे अद्वितीय उदाहरण आहे. डोंगरकड्यांचे नैसर्गिक बळ आणि त्याला जोडलेली भक्कम चिरेबंदी, तटबंदी यामुळे हा किल्ला जवळपास अभेद्यच मानला जात असे. साधारणपणे साडेतीन हजार फूट उंचीवर वसलेल्या या किल्ल्यापर्यंत पोहोचण्यासाठी सात दरवाज्यांतून जावे लागते. हे दरवाजे वळणदार व गुंतागुंतीच्या पद्धतीने बांधलेले असल्यामुळे शत्रू गोंधळून जाई, त्याचा वेग मंदावला जाई आणि मग गडावरून हल्ला चढविणे सोपे होई.

किल्ल्याच्या माथ्यावर पोहोचल्यानंतर एक विस्तीर्ण पठार दिसते. त्यात निवासासाठी घरे, धान्यसाठ्याची कोठारे, तसेच प्रस्तरात खोदलेली पाण्याची मोठी टाकी आहेत. उन्हाळ्यातील उष्णतेत किंवा शत्रूच्या दीर्घकाळ चालणाऱ्या वेढ्यातही या पाणीसाठ्यामुळे गडाची स्वायत्तता टिकून राहायची. किल्ल्याच्या उत्तरेला 'कडेलोट' नावाचा उग्र कडा आहे, जिथून शत्रूंना खाली फेकले जात असे.

किल्ल्याच्या आत शिवाई देवीचे मंदिर आहे. शिवनेरी हा केवळ सैन्यदृष्ट्या महत्त्वाचा गड नाही, तर धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्याही पूज्य मानला जातो.

आजही शिवनेरी महाराष्ट्राच्या लोकमानसात अपार आदराचे स्थान राखतो. दरवर्षी १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती येथे मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. हजारो शिवभक्त, शाळकरी मुले, इतिहासप्रेमी व पर्यटक या दिवशी गडावर एकत्र येतात. शिवनेरीचा गगनभेदी निनाद त्यांना धैर्य, शौर्य आणि स्वराज्याच्या विचारांनी प्रेरित करतो.

शिवनेरी किल्ल्याचा प्रवास केवळ ऐतिहासिक सफर नसून, त्याच्या आसपासच्या परिसरात अनेक अद्भुत ठिकाणे आहेत. इथे इतिहास, अध्यात्म आणि निसर्गसौंदर्य यांचा अनोखा संगम पाहायला मिळतो. किल्ल्यापासून अवघ्या पाच किलोमीटरवर लेण्याद्री लेण्या आहेत. या प्राचीन बौद्ध लेण्या उत्कृष्ट शिल्पकलेचे दर्शन घडवतात. याच गुंफांमध्ये असलेले गिरीजात्मज मंदिर अष्टविनायकांपैकी एक असून, गणेशभक्तांसाठी हे पवित्र स्थळ आहे. गुंफांपर्यंतच्या चढाई दरम्यान दिसणारे विस्तीर्ण निसर्गदृश्य मन मोहून टाकते.

शिवनेरीपासून दहा किलोमीटरवर असलेली ओझर आणि गिरीजात्मज गणपती मंदिरे भक्तांसाठी विशेष आकर्षण आहेत. विघ्नहर गणेशाला समर्पित असलेले ओझर मंदिर देखण्या वास्तू कलेसाठी प्रसिद्ध आहे. इथली शांत आणि भक्तिमय वातावरण प्रार्थनेसाठी पोषक आहे. निसर्ग प्रेमींसाठी माळशेज घाट हे रमणीय स्थळ शिवनेरीपासून तीस किलोमीटरवर आहे. धुक्याने वेढलेले डोंगर, वाहणारे धबधबे आणि जैव विविधतेने नटलेला परिसर इथे पाहायला मिळतो. पावसाळ्यात तर हा संपूर्ण प्रदेश हिरव्यागार शालूत नटतो. साहस प्रेमींनी नाणेघाटाला भेट द्यायलाच हवी. हा प्राचीन व्यापारी मार्ग आणि ट्रेकिंगचे प्रसिद्ध ठिकाण पस्तीस किलोमीटरवर आहे. इथल्या कोरीव शिला लेखांमधून शतकांपूर्वीच्या व्यापाऱ्यांच्या आठवणी जपल्या गेल्या आहेत. नाणेघाटातून सह्याद्री पर्वतरांगांचे विस्मयकारक दृश्य दिसते. केवळ सहा किलोमीटरवर जुन्नर लेण्या आहेत. दोन हजार वर्षांपूर्वी कोरलेल्या या बौद्ध लेण्यांमध्ये चैत्यगृह आणि विहारांचा समावेश आहे. कोरीव नक्षीकाम, प्राचीन काळातील भिक्षूंचे वास्तव्य आणि शिल्पकला यामुळे हे ठिकाण विशेष आहे. इतिहास, अध्यात्म आणि निसर्ग यांचा सुंदर मिलाफ असलेल्या शिवनेरी आणि त्याच्या आजूबाजूच्या ठिकाणांना भेट देण्याचा अनुभव अविस्मरणीय ठरतो.

युनेस्कोच्या जागतिक वारसा मानांकन यादीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा समावेश करण्यात आला असून, शिवनेरीलाही त्या सन्माननीय श्रेणीमध्ये स्थान मिळाले आहे. त्यामुळे शिवनेरीला जागतिक स्तरावरही ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा म्हणून विशेष ओळख प्राप्त झाली आहे.

खरे तर, शिवनेरी हा केवळ दगड आणि मातीचा किल्ला नाही तर तो आहे धैर्याचा स्रोत, चारित्र्याचा आधार आणि महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक. शिवनेरी किल्ला हा केवळ ऐतिहासिक वारसा नसून महाराष्ट्राच्या अभिमान, शौर्य आणि परंपरेचे प्रतीक आहे. इतिहासप्रेमी, ट्रेकिंगसाठी उत्सुक किंवा संस्कृतीचा अभ्यास करणारे पर्यटक इथे एक अद्वितीय अनुभव घेऊ शकतात. किल्ल्याच्या भव्यतेचा अनुभव घेत असताना, त्या महान युगाचा साक्षीदार होण्याची संधी लाभते, ज्या काळाने भारताच्या भवितव्याला आकार दिला. इथल्या सुळक्यांवर उभे राहून सह्याद्रीच्या विस्तीर्ण रांगांचे सौंदर्य डोळ्यांत साठवता येते. शिवनेरीचा प्रत्येक दगड, प्रत्येक तटबंदी आणि प्रत्येक वाट इतिहासाचे सोनेरी पान उलगडते.

**–संजय डी. ओरके**
**विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई**

# मराठा समाजाच्या स्वप्नांना पंख देणारी संस्था – सारथी

राज्यातील प्रत्येक घटकाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सामाजिक, आर्थिक सक्षमीकरण व शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा या समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासनाने २०१९ पासून 'सारथी' ही संस्था सुरू केली आहे. मराठा समाजाच्या स्वप्नांना पंख देणारी संस्था म्हणून 'शाहू विचारांना देऊया गती, साधूया सर्वांगीण प्रगती' या बोधवाक्याखाली छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे ही संस्था शिक्षण, मार्गदर्शन, कौशल्यविकास, रोजगार, उद्योजकता, संशोधन आणि सांस्कृतिक वारसा संवर्धन या सर्व क्षेत्रांत ६३ विविध उपक्रम राबवत आहे.

सारथी संस्थेमधील सन २०२१-२२ ते २०२४-२५ एकूण चार वर्षांमध्ये ८ लाख ३८ हजार ४७७ लाभार्थ्यांनी सहभाग घेतला असून अनेक विद्यार्थी या संस्थेमार्फत मार्गदर्शन घेऊन विविध क्षेत्रात यश संपादन करत आहेत. या संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण आणि मार्गदर्शनावर आतापर्यंत ६४७ कोटी रुपयांचा खर्च झालेला आहे. सारथी संस्थेमधील विद्यार्थी दरवर्षी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये निवडून येण्याचा नवीन उच्चांक निर्माण करत आहेत.

**शैक्षणिक संधी व शिष्यवृत्ती योजना**

सारथी मार्फत विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसाठी पूर्व प्रशिक्षण, मुलाखतीची तयारी, मार्गदर्शन यासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. सारथीच्या स्थापनेपासून २०२० ते २०२४ या कालावधीत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षेमध्ये ११२ विद्यार्थी निवडून शासनामध्ये सेवा बजावत आहेत. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामध्ये २०२० ते २०२३ या कालावधीत १०४८ विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले असून वर्ग एक मध्ये २२९ तर वर्ग दोन मध्ये ८१९ विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे.

**कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम**

सारथी मार्फत राबविण्यात येणारा छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्व विकास व संगणक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम हा महाराष्ट्र राज्यातील सर्व तालुकास्तरावर राबवण्यात येतो. या योजनेमध्ये कालानुरूप विविध अभ्यासक्रम शिकवले जातात. सन २०२२ ते २०२५ या कालावधीत एक लाख २० हजार लाभार्थ्यांना प्रशिक्षित करण्यात येणार होते, त्यापैकी ९७ हजार २८६ लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला असून ३४ हजार ३०४ लाभार्थ्यांनी आपले प्रशिक्षण पूर्ण केले आहे. यापैकी ७३६५ लाभार्थ्यांना नोकरी मिळाली असून ९४१८ लाभार्थ्यांची मुलाखत प्रक्रिया सुरू आहे. सध्या महाविद्यालयांमध्ये १७ हजार २५१ लाभार्थी प्रशिक्षण घेत आहेत.

**श्रीमंत मालोजीराजे भोसले सारथी इंडो जर्मन टूल रूम कौशल्य प्रशिक्षण उपक्रम**

या उपक्रमांतर्गत छत्रपती संभाजी नगर, नागपूर, पुणे, कोल्हापूर येथे आयटीआय, पदविका व अभियांत्रिकी पदवी प्राप्त १०१२ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. यापैकी ६५७ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले असून ३१४ विद्यार्थ्यांना नोकरी लागली आहे.

सारथी
शाहू विचारांना देवूया गती,
साधूया सर्वांगीण प्रगती

**परदेश शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना**

महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेश शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत सन २०२३-२४ मध्ये एकूण ५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांना आज अखेर एकूण सहा कोटी रुपयांच्या शिष्यवृत्ती रकमेचा लाभ देण्यात आला आहे. सन २०२४-२५ मध्ये या योजनेअंतर्गत एकूण ७५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. सन २०२५ करिता ७५ जागांसाठी दिनांक १६ जून २०२५ पर्यंत अर्ज मागविले होते, यामध्ये निवड प्रक्रिया सुरू आहे.

**डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती**

देशातील नामवंत २०० विद्यापीठात शिकणाऱ्या ३०० विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती देण्यात येते. यामध्ये शिक्षण शुल्क, लायब्ररी शुल्क, परीक्षा शुल्क, वसतीगृह शुल्क व भोजन शुल्काची १०० टक्के रक्कम प्रतिपूर्ती स्वरूपात देण्यात येते. सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये या योजनेअंतर्गत ४४१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात येऊन पाच कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे. सन २०२४-२५ मध्ये या योजनेसाठी २७० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या योजनेसाठी मार्च २०२५ अखेर सहा कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे.

**उदयोन्मुख कृषी औद्योगिक क्षेत्रातील शैक्षणिक संधी शैक्षणिक शुल्क प्रतिकृती योजना**

वसंतदादा साखर संस्था, पुणे येथील इंडस्ट्रियल फर्मिनेशन अँड अल्कोहोल टेक्नॉलॉजी (खऋअढ) आणि थळपश इअॅशुळपस रपव अश्रलेहेश्र ढशलहपेश्रेसू (थइअढ) विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना असून या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळालेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना १०० टक्के शैक्षणिक शुल्क रक्कम प्रतिपूर्ती स्वरूपात देण्यात येते. खऋअढ मधील एकूण ८० विद्यार्थ्यांना ४९.४० लाख व थइअढ मधील एकूण २८ विद्यार्थ्यांना ३४.५४ लाख रूपये शैक्षणिक शुल्क अदा करण्यात आले. यापैकी २०२२-२३ मधील पास झालेल्या विद्यार्थ्यांपैकी एकूण सात विद्यार्थ्यांना नोकरी लागलेली आहे.

**शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी**

सेनापती धनाजी जाधव सारथी शेतकरी ड्रोन पायलट प्रशिक्षण योजनेमध्ये राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ येथे शेतकऱ्यांना मोफत प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये ३३० शेतकऱ्यांनी ड्रोन पायलट प्रशिक्षण पूर्ण केले आहे. शेतकरी मावळा सारथी कौशल्य विकास प्रशिक्षण अंतर्गत मधुमक्षिका पालन प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये वार्षिक लाभार्थी ५०० असून २०२५ पासून हे प्रशिक्षण सुरू झाले आहे. पशुधन संगोपन व मुरघास निर्मिती प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत वर्षभरात एक हजार लाभार्थ्यांना उरळी कांचन येथील बायफ या संस्थेमार्फत ३० दिवसीय निवासी प्रशिक्षण, ६० दिवसीय प्रक्षेत्रिय प्रशिक्षण ८९ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

**कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम**

महाराणी सईबाई सारथी रोजगार व स्वयंरोजगार कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम पुणे, वाशिम, कोल्हापूर, गडचिरोली, छत्रपती संभाजी नगर, नांदेड, नागपूर, नाशिक, पालघर, बीड, रत्नागिरी या जिल्ह्यात राबवला जातो. या सर्व जिल्ह्यांत एकूण १४१९ अभ्यासक्रम राबविले जात असून त्यापैकी ९८९ अभ्यासक्रम पूर्ण झालेले आहेत. सरदार सूर्याजी काकडे सारथी वाहन चालक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत आय.डी.टी.आर. भोसरी पुणे येथे हलकी व जड वाहने चालवण्याचे ३० दिवसाचा प्रशिक्षण देण्यात येते. सन २०२५ मध्ये या प्रशिक्षणास सुरुवात झाली असून आत्तापर्यंत ४९ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे. सरसेनापती हंबीरराव मोहिते सारथी मोडी लिपी प्रशिक्षण योजनेअंतर्गत २६० विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय करियर मार्गदर्शन व समुपदेशन शिबिरामध्ये सन २०२२ पासून ते २०२५ मध्ये १९ हजार १९१ विद्यार्थ्यांनी करिअर मार्गदर्शनाचा लाभ घेतला आहे.

**निबंध स्पर्धांचे आयोजन**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज तालुकास्तरीय निबंध स्पर्धा योजनेमध्ये इयत्ता तिसरी ते पाचवी विद्यार्थी व इयत्ता सहावी ते दहावी विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा घेतली जाते. या स्पर्धेत सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत तीन लाख १६ हजार ५९२ इतके विद्यार्थी सहभागी झाले असून त्यापैकी ९४४४ इतक्या विद्यार्थ्यांनी पारितोषिक प्राप्त केले आहे. या स्पर्धांसाठी १७ लाख ९३ हजार रुपयांची पारितोषिक ठेवण्यात आली होती.

**छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती**

आर्थिक दुर्बल घटकातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळविण्याच्या दृष्टीकोनातून ही योजना राबविली जाते. छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेअंतर्गत सन २०१९ पासून ते २०२३ पर्यंत ३०७८ विद्यार्थी योजनेसाठी पात्र होते. त्यापैकी ३९४ विद्यार्थ्यांनी पीएचडी पूर्ण केली असून १०३ विद्यार्थ्यांना नोकरी लागलेली आहे.

**सरसेनापती संताजी घोरपडे उद्योजकता विकास कार्यक्रम**

सरसेनापती संताजी घोरपडे सारथी उद्योजकता विकास कार्यक्रमांतर्गत इनक्युबेशन हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या माध्यमातून स्टार्टअप कल्पनांना मूर्त रूप देण्यासाठी व्यवसाय मार्गदर्शन व विद्यावेतन स्वरूपात आर्थिक साहाय्य दिले जाते. महाराष्ट्रातील शासनमान्य यादी पैकी १३ इनक्युबेशन केंद्राने सारथी संस्थेबाबत सामंजस्य करार केला आहे. सारथीमार्फत लाभार्थ्यांना एक वर्षासाठी इनक्युबेशन केंद्राकडे प्रायोजित केले जाते. सन २०२५ या वर्षी १२० लाभार्थ्यांनी याचा लाभ घेतला आहे.

**सर्व सोयी-सुविधायुक्त छत्रपती शिवाजी महाराज संकुल**

सारथी संस्थेमार्फत पात्र विद्यार्थ्यांना प्राधान्याने सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यभरात छत्रपती शिवाजी महाराज संकुल उभारण्यात येत आहेत. या इमारत बांधकामासाठी शासनाने मोफत जमिनी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. प्रत्येक संकुलामध्ये ५०० मुलांचे वसतीगृह, ५०० मुलींचे वसतीगृह, ३०० विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, सारथी विभागीय कार्यालयांचा समावेश आहे. सारथीच्या पुणे येथील मुख्यालयाचे बांधकाम पूर्ण झाले असून नवीन इमारतीमध्ये प्रशासकीय कामकाज सुरू झाले आहे. इतर विभागीय कार्यालयाची कामे प्रगतीपथावर असून लवकरात लवकर ती पूर्ण करण्यात येत आहेत.

**सरनोबत नरवीर तानाजी मालुसरे ऐतिहासिक दस्तऐवज जतन योजना**


सारथी मार्फत सरनोबत नरवीर तानाजी मालुसरे ऐतिहासिक दस्तऐवज जतन योजना राबवण्यात येत असून यामध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यकाळातील प्रकाशित कागदपत्र, आदेश, हुकूमनामा इत्यादी दस्तऐवज पुराभिलेख संचालनालयाकडून डिजिटल स्वरूपात प्राप्त केले आहेत. या ऐतिहासिक दस्तऐवजाच्या विषयावर पुस्तके प्रकाशित करण्यात येणार आहेत. सारथी संस्थेमार्फत शिवराज्याभिषेक अभियान, किल्ले संवर्धन, वृक्षारोपण, जनजागृती अभियान राबवण्यात येत आहे.

**सारथी ची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध उपक्रम**

सारथीच्या उपक्रमांची माहिती देण्यासाठी सारथीचे संकेतस्थळ https://www.sarthi-maharashtragov.in/,, सारथी अँड्रॉइड एप्लीकेशन https://play.google.com/store/apps/details?id=com.srthinew, फेसबुक पेज facebook.com/sarthimaharashtra,यूट्यूब चॅनल @sarthipune178, इंस्टाग्राम अकाउंट https://www.instrgram.com/sarthi.puneआणि सारथी व्हाट्सअॅप चॅनेल https://whatsapp.com/channel सुरू आहे. ज्या द्वारे सारथीच्या योजनांची माहिती सर्वसामान्यांना मिळत आहे. विविध युवा शिबिरे, सारथी दिनदर्शिका वाटप यासारखे उपक्रमातून लाभार्थ्यांपर्यंत माहिती पोहोचविण्यात येत आहे.

मराठा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या सारथी संस्थेमुळे हजारो विद्यार्थी व शेतकऱ्यांना मार्गदर्शन व शैक्षणिक बळ मिळत आहे. या समाजातील मागास घटकांना सक्षम, स्वावलंबी आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करणारा व नवयुगाची आव्हाने पेलणारा समाज तयार करण्यामध्ये सारथी मोलाची भूमिका बजावत आहे. योग्य शिक्षण, दिशा आणि संधी मिळाल्यास यश मिळवता येते. हे स्वप्न सत्यात उतरवण्याचे काम सारथी संस्था करत आहे. मराठा समाजातील गरजू, होतकरू युवक व युवती या संस्थेच्या माध्यमातून स्पर्धेच्या युगात दरवर्षी मोठ्या प्रमाणात यश संपादन करत आहेत. मराठा समाजातील प्रत्येक घटकाला विकासाच्या समान संधी उपलब्ध करुन विकासाच्या प्रवाहात अग्रेसर ठेवणारी सारथी नक्कीच या समाजासाठी एक दीपस्तंभ ठरत आहे.

**– संध्या गरवारे-खंडारे,**
**विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**



'दैनिक महा मेट्रो', मालक, प्रकाशक, संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे, यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, शॉप नंबर १, बेसमेंट वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे- ४११०३० येथे छापून फ्लॅट नंबर ९, फ्रेंड्स पॅराडाईज, शिरोळे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४ येथे प्रकाशित केले.
वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.
मालक, प्रकाशक आणि संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे – ९९२२९३०१९५, कार्यालय संपर्क क्रमांक : ९९७०६८८८६५ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.) Email : Mahametronews.pune1gmail.com

This 'Daily Maha Metro', Owner, Publisher by Dilip Kisan Kurhade printed at Shree Samarth Printers, Shop No. 1, Basement Vartak partment, 499, Shaniwar Peth, Pune 411030, Published from Flat No. 9, Friends Paradise Society, Shirole Road, Shivajinagar, Pune-411004.The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper. Legal matters will be resolved under Pune Courts. Owner, Publisher Editor Dilip Kisan Kurhade Contact No. - 9922930195, Office Contact No. - 9970688865 (Responsible for selection of news under PRB ct.) Email. - Mahametronews.pune@1gmail.com

पान १ वरून

## मनोज जरागे पाटील यांनी अध्यादेश स्वीकारला

देण्यात येईल. सातारा गॅझेटवर अभ्यास करून त्याला जलद मान्यता देण्यात येईल. त्यामध्ये काही त्रुटी आहेत, एका महिन्यात त्याला मान्यता देण्यात येणार आहे. मराठा आदोलकांवरील या आधीचे गुन्हे सप्टेंबर अखेर मागे घेण्यात येणार. शैक्षणिक पात्रतेनुसार शासकीय नोकरी देणार. मराठा आरक्षणाच्या आंदोलनामध्ये बलिदान दिलेल्या वारसांसाठी १५ कोटींची मदत देणार. आठवड्याभरात त्यांच्या खात्यात मदत जमा होईल.

## वर्षभर उत्सवात अल्पवयीन कार्यकर्त्यांना 'व्यसनाचा' डोस!

निवडणुकीच्या प्रचारात आघाडीवर असतात. या निवडणुकीतच अशा अल्पवयीन मुलांच्या टोळ्या तयार होऊन वर्चस्वासाठी त्यांच्यामध्ये मारामाऱ्या होतात. त्यांना अटक होते. त्यांना सोडवण्यासाठी हेच नेते पोलीस ठाण्यात जातात. एकादा अमुक एका नेत्याचा कार्यकर्ता म्हणून त्याच्यावर शिक्का पडला कि तो वस्तीचा ' दादा' होतो. हाच दादा पुढे आपली टोळी तयार करतो. पुन्हा वर्षभर सण, उत्सव, उरूसाच्या तयारीला लागतो. हे वास्तव शहरातील सर्वच वस्त्यांमध्ये कमी अधिक प्रमाणात दिसते. त्यामुळे अल्पवयीन मुलांना काम न करता पैसा मिळतो, त्यातून व्यसनही भागते त्यातून वस्तीवर वर्चस्ववादातून गुन्हेगारी टोळ्या तयार व्हायला सुरवात होते. अवैध धंद्यांना पोलीसांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पाठिंबा शहरातील प्रत्येक पोलीस ठाणे हा कायदा व सुव्यवस्थेचा कणा आहे. 'सद्रक्षणाय, खलनिग्रहणाय' अर्थात 'सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचे कर्दनकाळ' हे पोलीसांचे घोषवाक्य आहे. मात्र, सध्या अशी स्थिती दिसत नाही. शहरातील वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात परराज्यातून आलेला गुटखा विकला जातो. या व्यवसायातील मोठे व्यापारी, दलालांना पोलीसांचा वरदहस्त आहे. त्यामुळे त्यांचा व्यवसाय अव्याहतपणे सुरू आहे. हाच गुटखा शहरातील वस्त्यांवस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात विकला जातो. त्यामुळे अल्पवयीन मुले गुटख्यांचे व्यसन करताना आढळतात. शाळेच्या शंभर मीटर परिसरात गुटखा, सिगारेट विक्रीला बंदी आहे. तरी सुद्धा अनेक शाळेच्या शेजारी असलेल्या पान टपऱ्यांमध्ये, दुकानात, चहाच्या स्टॉलवर मोठ्या प्रमाणात गुटखा व सिगारेट विकली जाते आहे. चौकट शहरातील वस्त्या बनल्या गांजाचे आगार शहरातील वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गांजाची विक्री होत आहे. वस्त्यांमधील अल्पवयीन मुलांच्या माध्यमातून गांजाची विक्री केली जाते. याची संपूर्ण माहिती स्थानिक पोलीस ठाण्यातील तपास पथकाला असते. पोलीसच अल्पवयीन मुलांना विक्रीसाठी प्रवृत्त केल्याच्या घटना येरवडा व विशांतवाडी परिसरात घडल्या आहेत. ललित पाटील ड्रग्ज प्रकरणात धानोरीतून चक्क अमली पदार्थांनी भरलेला एक टेम्पो पोलीसांनी पकडला होता. तर फर्ग्युसन रस्त्यावरील एका हॉटेलमध्ये भवानी पेठेतील कासेवाडीतून अमली पदार्थांचा पुरवठा झाल्याचे उघड झाले होते.

## मराठा आंदोलनात घडला घुसखोरीचा धक्कादायक प्रकार

आहेत. आझाद मैदानासह संपूर्ण दक्षिण मुंबई भगवामय झाली असून, कोर्ट आणि पोलिसांच्या नोटीसीनंतरही आंदोलनाची ताकद कमी झालेली नाही. मात्र अशा संशयास्पद व्यक्तींमुळे आंदोलनात घुसखोरी होत असल्याने परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आंदोलकांचा ठाम पवित्रा असा आहे की – आरक्षण मिळाल्याशिवाय आम्ही मागे हटणार नाही, पण आमच्या आंदोलनात गोंधळ घालण्यासाठी बाहेरून लोक येणं हे अत्यंत संशयास्पद आणि धोकादायक आहे. सध्या मुंबई पोलिसांनी त्या परप्रांतीय तरुणाला ताब्यात घेतलं असून त्याची कसून चौकशी सुरू आहे. या प्रकारामुळे आंदोलनात खळबळ उडाली असून आंदोलनाला बदनाम करण्यामागे नेमका कोणाचा डाव आहे, याची चौकशी होण्याची मागणी आंदोलक करत आहेत.

## मोशी खाण येथील गणेश विसर्जन स्थळाची अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्याकडून पाहणी...

सोयीसुविधा उपलब्ध करण्याचे निर्देशही अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या पाहणी दौऱ्यावेळी महापालिकेचे सह शहर अभियंता अनिल भालसाखळे,उप आयुक्त अण्णा बोदडे, सचिन पवार,निलेश भदाणे,संदीप खोत, सिताराम बहुरे,मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, क्षेत्रीय अधिकारी निवेदीता घार्गे,अश्विनी गायकवाड,तानाजी नरळे,किशोर ननावरे,,पूजा दूधनाळे,सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच कार्यकारी अभियंता विजय भोजने,वैशाली ननावरे,चंद्रकांत मुठाळ,सुनिलदत्त नरोटे,सतीश वाघमारे,हेमंत देसाई,विजय जाधव, सहाय्यक आरोग्याधिकारी,आरोग्य निरीक्षक यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पिंपरी चिंचवड शहरातील मोशी खाण हे एकत्रित मूर्ती विसर्जनाचे स्थळ असून या ठिकाणी दरवर्षी हजारो गणेशमूर्तींचे विसर्जन पार पडते. त्यामुळे येथे गणेश विसर्जनसाठी येणाऱ्या मूर्तींसाठी वाहतूक व्यवस्था, मनुष्यबळ,क्रेन, सुरक्षाव्यवस्था, स्वच्छता, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, या बाबींची काटेकोर तयारी आवश्यक आहे,याचा सविस्तर आढावा अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी संबंधीत अधिकाऱ्यांसोबत घेतला. यावेळी त्यांनी विसर्जनासाठी करण्यात आलेल्या तलावांची तयारी, पाण्याची उपलब्धता, पथदिवे, दिशादर्शक फलक,रस्त्यांची स्थिती, पार्किंगची सोय, पोलीस बंदोबस्त, अग्निशामक दलाची तैनाती याबाबत माहिती घेतली. तसेच कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छतेसाठी आवश्यक ती यंत्रणा कार्यरत ठेवण्याचे आदेश दिले. मोशी खाण व्यतिरिक्त पिंपरी चिंचवड शहरातील इतरही विसर्जन स्थळांवर महापालिकेतर्फे सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

## समतेचा वडापाव: अखिल जनवाडी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा प्रेरणादायी जिवंत देखावा

वडापाव. हा जिवंत देखावा सामाजिक समतेचा प्रभावी रूपात्मक संदेश होता. प्रत्येक जिवंत देखाव्यानंतर भाविकांना जात-धर्मादरहित प्रसाद म्हणून ''वडापाव'' वाटप करण्यात येत आहे. या उपक्रमात संगमनेर येथील प्रसिद्ध वडापाव विक्रेते,अन्सार चाचा इनामदार, यांनी आपल्या आवाजात जात-धर्म न पाहता सर्वांमध्ये समानतेचा संदेश दिला, ज्यामुळे जनतेमध्ये खूप चांगला आदर्श निर्माण झाला. स्थानिक कार्यकर्त्यांच्या सहभागाने हा जीवंत देखावा साकारण्यात येतो.या जीवंत देखाव्याची संकल्पना डॉ. आनंद करंदीकर यांची असून उमेश वाघ यांनी निर्मिती केले आहे. अन्सार चाचा इनामदार यांचे विशेष सहकार्य लाभलेल्या या जीवंत देखाव्याचे संयोजन मंगला पाटील, विनोद सकट, अशोक खुडे, संजय मयेकर, अभिजीत धाडवे, विवेक कांबळे, आदि कार्यकर्ते परिश्रम घेतआहेत.

# आरक्षणाचा अंतिम मसुदा तयार, तो जरांगेंना देणार : विखे पाटील

**मुंबई । प्रतिनिधी**

मनोज जरांगे यांच्या मागण्यावर उपसमितीने चर्चा केली असून त्यावर अंतिम मसुदा तयार केला आहे. तो मसुदा आता लवकरच मनोज जरांगे यांना देण्यात येणार असल्याची माहिती मराठा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. या संबंधित चर्चा करुन मार्ग काढणार असून मनोज जरांगे त्याला प्रतिसाद देतील अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे आंदोलन करत असून त्यांच्या आंदोलनाचा आजचा पाचवा दिवस आहे.मनोज जरांगे यांच्या मागण्याबाबत सरकार सकारात्मक असून त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी उपसमिती जाणार आहे अशी माहिती विखे पाटील यांनी दिली.

राज्याचे मंत्री शिवेंद्रराजे, जयकुमार गोरे यांच्यासह काही महत्त्वाचे नेते या समितीत असतील अशी माहिती विखेंनी दिली. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, मराठा आरक्षणाच्या संबंधी निर्णय हा उपसमितीला घ्यायचा आहे. न्यायमूर्ती शिंदे समितीने जरांगे यांची भेट घेतली. त्यावेळी न्यायमूर्ती शिंदे आणि जरांगे यांच्यामध्ये झालेल्या चर्चे वर पुन्हा आमच्यामध्ये चर्चा झाली. कायद्याच्या चौकटीत गोष्टी कशा बसतात यावर चर्चा केली. त्यानंतर आता अंतिम मसुदा तयार करण्यात आला असून तो जरांगे यांना देण्यात येणार आहे.

आम्ही न्यायालयाच्या निर्णयाचा आदर राखतो, त्यांच्या निर्देशानुसार सर्व रस्ते रिकामे केले. पण मनोज जरांगे आझाद मैदान सोडणार नाहीत असं मराठा समन्वयक गंगाधर काळकुटे यांनी स्पष्ट केलं.या आधी सुनावणी घेताना मुंबई उच्च न्यायालयाने दुपारी ३ वाजेपर्यंत आझाद मैदान रिकामं करण्याचे आदेश सरकारला दिले होते. लोकांमध्ये भीतीचं वातावरण असून ते घराबाहेर पडू शकत नाहीत असं निरीक्षण न्यायालयाने नोंदवलं होतं. त्यामुळे प्रशासनाने मैदान रिकामं करावं, अन्यथा आम्ही स्वतः रस्त्यावर उतरुन आढावा घेऊ अशा इशाराही दिला होता.



# केडगाव रेल्वे स्टेशनवर प्रवाशांचा हाल; पुण्याला जाणाऱ्या गाड्यांची कमतरता, आंदोलनाचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील मोठ्या बाजारपेठ असलेल्या केडगाव रेल्वे स्टेशनवर प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. सकाळी ८:५० वाजता बारामती-पुणे डेमू गाडी निघाल्यानंतर सायंकाळी ५:२६ वाजेपर्यंत पुण्याकडे जाणारी कोणतीही गाडी उपलब्ध नाही. या स्टेशनवर आसपासच्या २५-३० गावांमधील सुमारे ३,००० प्रवासी पुण्याला जाण्यासाठी अवलंबून आहेत. स्थानकाचे नुकतेच १२.५५ कोटी रुपये खर्च करून नूतनीकरण झाले असले तरी रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या मूळ गरजा दुर्लक्षित केल्याने संताप व्यक्त होत आहे. पुणे-सोलापूर महामार्गावरील वाहतूक कोंडी आणि धोकादायक रस्त्यांमुळे लोक रेल्वेला प्राधान्य देत असतानाही, कमी फेऱ्या आणि अपुरी सुविधा प्रवाशांना त्रास देत आहेत.



**प्रवाशांचा संताप**

स्थानिक रेल्वे प्रवासी संदीप पांढरे यांनी सांगितले, कोविडपासून बंद झालेल्या गाड्यांची संख्या वाढवावी, अन्यथा आंदोलन करावे लागेल. तर पुण्यात स्टाफ नर्स म्हणून कार्यरत सारिका मोटे-जाधव म्हणाल्या, दुसऱ्या शिफ्टसाठी पुण्याला जाण्यासाठी एकही गाडी उपलब्ध नाही. रस्त्याने प्रवास करताना अनेक अडथळे येतात. रेल्वे प्रशासनाने गाड्यांच्या फेऱ्यांमध्ये तातडीने वाढ करावी.

**रेल्वे प्रशासनाचे आश्वासन**

पुणे डिव्हिजनल कमर्शियल मॅनेजर हेमंत कुमार बेहरा म्हणाले, प्रवाशांच्या मागणीनुसार काही गाड्यांना थांबा देणे किंवा नवीन गाडी सुरू करणे शक्य आहे का, याचा अभ्यास सुरू आहे. वरिष्ठांना पाठपुरावा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल.

**प्रवाशांची कोंडी**

केडगाव रेल्वे स्टेशनवर गाड्यांच्या कमी फेऱ्यांमुळे डेमूमध्ये प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागत आहे. रेल्वे प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास प्रवाशांचा उद्रेक होण्याची शक्यता आहे.

# गणेशोत्सव राज्य महोत्सव : स्पर्धा व पोर्टलला प्रतिसाद

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवास २०२५ पासून राज्य उत्सवाचा दर्जा देण्यात आला आहे. या राज्य महा उत्सवांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या *महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा*चा या वर्षापासून तालुकास्तरापर्यंत विस्तार करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्हा व राज्यस्तरांसोबतच तालुकास्तरीय पारितोषिके देखील देण्यात येणार आहेत. महाराष्ट्रभरातील तब्बल ४०४ मंडळांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला असून स्पर्धेचे परीक्षण सहभागी तालुक्यांत सुरू आहे.

राज्योत्सवाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरलेले घरगुती व सार्वजनिक गणपती बाप्पांचे छायाचित्र अपलोड करण्यासाठी स्वतंत्र पोर्टल देखील लोकांसाठी व मंडळांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे. या पोर्टलवरून भाविक मोठ्या संख्येने आपल्या गणपती बाप्पांची छायाचित्रे अपलोड करत असून आजवर २०० हून अधिक घरगुती व ७० हून अधिक सार्वजनिक मंडळांचे छायाचित्रे अपलोड करण्यात आली आहेत. यामुळे घरबसल्या घरोघरीच्या व सार्वजनिक मंडळांच्या बाप्पांचे दर्शन गणेशभक्तांना शक्य झाले आहे. तसेच, महाराष्ट्रातील प्रसिद्ध गणपती मंदिरे व सार्वजनिक मंडळांच्या गणपतींचे थेट दर्शन एकाच पोर्टलवर जगभरातील गणेशभक्तांना उपलब्ध होत आहे. मुंबईचा लालबागचा राजा, मुंबईचा राजा, खेतवाडीचा गणराज, पुण्याचा दगडूशेठ हलवाई, श्री सिद्धिविनायक मंदिर, अष्टविनायक आणि टिटवाळ्याच्या गणपतीचे दर्शन एका क्लिकवर शक्य झाले आहे. या दोन्ही पोर्टलमुळे जगभरातील गणेशभक्तांना राज्यातील विविध जिल्ह्यांतील व शहरांतील गणेशमूर्तींचे दर्शन घेणे अतिशय सुलभ झाले आहे.



# निवडणुकीची प्रभाग रचना की, प्राणी संग्रहालयातील वेगवेगळ्या प्राण्यांचे छायाचित्र? : अरविंद शिंदे

**पुणे । प्रतिनिधी**

महाविकास आघाडील काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने काँग्रेस भवन येथे आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीतील प्रभाग रचनेच्या खुलाश्यांसंदर्भात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. सदर परिषदेस काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली सदर पत्रकार परिषद पार पडली.

यावेळी काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे म्हणाले की, ''निवडणुक आयोगाने जाहिर केलेल्या नियमावलीनुसार प्रभाग रचना होणे अपेक्षित असते. परंतु वरील अनेक नियमावलीतील नियमांचे उल्लंघन आगामी पुणे मनपा निवडणुकीतील प्रभाग रचना तयार करताना केले गेल्याचे निदर्शनास आले आहे. तसे की, प्रभाग रचना करताना नदी, नाले, मुख्य रस्ते यांसारख्या नैसर्गिक सीमांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. वेडेवाकडे प्रभाग आखल्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयी निर्माण होतील.

काही प्रभागांमध्ये मागासवर्गीय वस्त्यांची जाणीवपूर्वक विभागणी करण्यात आली आहे. या मागचा उद्देश म्हणजे त्या प्रभागात मागासवर्गीय समाजाला आरक्षण लागू पडू नये. ही बाब सामाजिक न्यायाला धक्का पोहोचवणारी आहे. भाजपा माजी नगरसेवक गणेश बिडकर यांच्या प्रभागात अनुसूचित जाती जमातीचे आरक्षण पडलेले नाही.

काही प्रभाग चार वेगवेगळ्या विधानसभा मतदारसंघातून भाग घेऊन तयार केले गेले आहेत. यामुळे प्रशासकीय सुसूत्रतेचा अभाव निर्माण होण्याची शक्यता आहे. यामुळे राज्य निवडणुक आयोगाने जाहिर केलेली आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीची प्रभाग रचना आहे की, प्राणी संग्रहालयातील वेगवेगळ्या प्राण्यांचे छायाचित्र? असा गंभीर प्रश्न निर्माण होतो.

जाहिर केलेल्या प्रभाग रचनेची एकंदरीत स्थित पाहता ती पूर्णपणे सत्ताधारी पक्षाच्या राजकीय हस्तक्षेपाने तयार करण्यात आली आहे.

# पुणे विमानतळावर १३ किलो 'हायड्रोपोनिक' गांजा जप्त; दोन्ही महिलांसह चौघे अटकेत

**पुणे । प्रतिनिधी**

बँकॉककहून हायड्रोपोनिक गांजा विक्रीसाठी आणणाऱ्या चार प्रवाशांना पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागाच्या पथकाने पकडले. तपासात १३ किलो ७२५ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला असून, या गांजाची आंतरराष्ट्रीय बाजारात कोट्यवधी रुपये किंमत आहे.

अटक करण्यात आलेले प्रवासी मुंब्रा (ठाणे), बलसाड (गुजरात) आणि पालघर जिल्ह्यांचे रहिवासी आहेत. आरोपींची नावे अशी आहेत: आलिया इलियास अन्सारी (२४ वर्षे), मोहम्मद कैफ अन्सारी (२३ वर्षे, सोनाजीनगर, मुंब्रा), जहिदहुसेन शेख (२९ वर्षे, किल्ला परडी, बलसाड) आणि झैबुनिसा अमिन शेख (४६ वर्षे, धानानी नगररोड, बोईसर, पालघर). कस्टमच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, अन्सारी आणि शेख हे बँकॉकहून विमानाने पुण्यात आले होते. विमानतळावर ते घाईघाईत बाहेर पडत असल्याने पथकाला संशय आला. तपासणी दरम्यान त्यांच्या बॅगेतून तीव्र वास आला. बॅगेत तपासणी केली असता हिरवट रंगाचा प्रक्रिया केलेला गांजा आणि २६ पाकिटे हवाबंद अवस्थेत सापडली.




पथकाला माहिती मिळाली की झैबुनिसा शेख ही विमानतळाबाहेर थांबलेली होती आणि तिने अन्सारी व शेखांना बँकॉकहून गांजा आणण्याची जबाबदारी दिली होती. त्यानंतर तिला ताब्यात घेतले गेले. सर्व आरोपींना अटक करून त्यांच्याविरुद्ध अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्यावतीने कौशल्य स्पर्धेचे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

शांघाई येथे सन २०२६ मध्ये आयोजित होणा-या जागतिक कौशल्य स्पर्धेच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने ६३ क्षेत्रांशी संबंधित कौशल्य स्पर्धा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, सेक्टर स्कील कौन्सिल, विविध औद्योगिक आस्थापना यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेचे आयोजन जिल्हा, विभाग, राज्य तसेच देश पातळीवर करुन निवड केलेल्या उमेदवारांची नावे पुढील जागतिक नामांकनासाठी पाठविण्यात येणार आहेत. जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ करिता वयोमर्यादा हा एकमेव निकष आहे.




ॲडीटिव्ह मॅन्युफॅक्चरींग, क्लाऊड कंप्युटिंग, सायबर सुरक्षा, डिजीटल कंस्ट्रक्शन, इंडस्ट्रियल डिझाईन टेक्नोलॉजी, मेकॉट्रॉनिक्स, रोबोट सिस्टम इंटिग्रेशन, वॉटर टेक्नोलॉजी, आयसीटी नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चर, इंडस्ट्री ४.० , ऑप्टोइलेक्ट्रानिक टेक्नोलॉजी, डेंटल, प्रोथेस्टिक्स आणि एअरक्राफ्ट मेंटेनंस या क्षेत्राकरिता उमेदवारांचा जन्म १ जानेवारी २००१ किंवा त्यांनतरचा असणे आवश्यक आहे. इतर ५० क्षेत्राकरिता उमेदवारांचा जन्म १ जानेवारी २००४ किंवा त्यांनतरचा असणे आवश्यक आहे. सर्व शासकीय आणि खाजगी औदयोगिक प्रशिक्षण संस्था, एमएसएमई, दूल रुम्स, सिपेट, आयआयटी, अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतन महाविदयालये, आयएचएम / हॉस्पिटॅलिटी इन्स्टिटयूट्स, कॉर्पोरेट टेक्निकल इन्स्टिट्यूट, स्किल ट्रेनिंग इन्स्टिटयूट, महाराष्ट्र राज्य कौशल्य विदयापीठ, एमएसबीवीईटी, खाजगी कौशल्य विदयापीठ, फाइन आर्टस कॉलेज, फ्लॉवर ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, इन्स्टिट्यूट ऑफ ज्वेलरी मेकिंग तसेच इतर सर्व महाविदयालये व महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी अधिनस्त सर्व व्यवसाय प्रशिक्षण संस्था मधील उमेदवारांना स्पर्धेकरिता नोंदणी करता येईल.

https://www.skillindiadigital.gov.in/ या वेबपोर्टलला भेट देऊन ३० सप्टेंबर २०२५ पूर्वी नाव नोंदणी करावी. जिल्हयातील सर्व संबंधित संस्थांनी पुढाकार घेऊन कौशल्य स्पर्धेबाबतची माहिती अधिकाधिक उमेदवारांपर्यंत पोहोचवावी असे, आवाहन सु.रा. वऱ्हाडे, सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, पुणे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

## महत्वाचे...

### खंडणीसाठी तीन आरोपी अटकेत

**पुणे । प्रतिनिधी**

गणेशम फेज-२ सोसायटीच्या मेन गेटवर रात्री १२ वाजता तीन अनोळखी लोक आले. त्यांनी सुरक्षा गार्डांना धमकावून सोसायटीत प्रवेश केला आणि चेअरमनला बोलवायला सांगितले. शिवराजे मित्रमंडळाच्या नावाने ३,५०० रुपये मागितले; पैसे न दिल्यास परत येऊन त्रास देण्याची धमकी दिली. आरोपी सचिन ओव्हाळ, अजय ठोंबरे आणि शुभम गायकवाड यांना अटक करण्यात आली.

### हिंजवडी कंपनीत जॉब फसवणुकीची घटना

**पुणे । प्रतिनिधी**

हिंजवडी फेज-२ येथील फ्लायरनॅट सास प्रा. लि. कंपनीत जॉब प्लेसमेंटच्या नावाखाली २४ वर्षीय राहुल शिंदे आणि इतरांच्या जॉब फी घेतली गेली. आरोपींनी ऑनलाइन ट्रेनिंग देऊन काम न देता, वेगवेगळ्या कारणांनी बाहेर काढून २७,०३,००० रुपये फसवले आणि स्वतः साठी वापरले. महिला संचालक, उपेश पाटील आणि रोहन अंबुलकर यांना अटक करण्यात आली आहे.

### भोसरीत सिमेंट ब्लॉक हल्ल्यात युवक जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

भोसरी सहल केंद्राजवळ लांडगे सभागृह जवळ एका युवकावर दत्ता जगन्नाथ जाधवने सिमेंटचा ब्लॉक फेकून हल्ला केला. यामध्ये पीडिताचे नाक, ओठ आणि दातातून रक्त आले, तसेच छातीवर मुक्का बसल्यामुळे गंभीर दुखापत झाली. आरोपीला अटक करण्यात आली आहे.

### लवळे रोडवर वाहन अपघात; मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

मुळशी तालुक्यातील लवळे रोडवर संतोष वाळू बोराटे पायी चालत असताना अज्ञात वाहनाने धडक दिली. यामुळे त्याच्या डोक्याला आणि चेह-याला गंभीर दुखापत झाली, ज्यामुळे त्याचा मृत्यू झाला. आरोपी चालक घटनास्थळीून पळून गेला.

### चिखलीत बालक तलवारसह पकडला

**पुणे । प्रतिनिधी**

नेवाळे वस्ती, साने चौक, चिखली येथे पोलीसांनी एका विधीसंघर्षीत बालकाला १००० रुपये किंमतीची लोखंडी तलवार बाळगताना पकडले. संबंधित बालकावर पोलीस आयुक्तालयाच्या आदेशांचा भंग केल्याप्रकरणी त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

### हडपसर बसमध्ये सोन्याची रिंग चोरी

**पुणे । प्रतिनिधी**

हडपसर वाघोली बस क्रमांक १६७ मध्ये प्रवास करणाऱ्या १७ वर्षीय मुलीच्या कानातील सुमारे १३ हजार रुपये किमतीची सोन्याची रिंग अज्ञात इसमाने लंपास केली. ही घटना ३० ऑगस्ट रोजी दुपारी साधारण २.४० वाजता हडपसर बसस्टॅण्डवर घडली. पोलिसांनी अज्ञात इसमाविरोधात गुन्हा दाखल केला असून अधिक तपास महिला पोलीस अंमलदार माने करीत आहेत.




## अभिनव उपक्रम नी साजरा होता असतो श्री राम मंडळ व ट्रस्ट चा गणेशउत्सव

सालाबादप्रमाणे दरवर्षी सुद्धा श्री राम मंडळाने गणेशउत्सव मध्ये सामाजिक उपक्रम करण्यासाठी आर्थिक पाठबळ पेक्षा ईच्छा शक्ती प्रखर लागते आणि छोट्या छोट्या सामाजिक संदेश देणारी कार्यक्रम सुद्धा घेता येतात याचे उदहारण नेहमीच दिले आहे.

देखावा - मयूर मंदिर

१) शिवशंभु प्रश्नामंजुषा - छत्रपती शिवाजी महाराज छत्रपती संभाजी महाराज यांच्या जाजवल्य इतिहासावर आधारित प्रश्नामंजुषा. ज्याने इतिहासाची पाळेमुळे चिमकुल्या मनावर खोलवर रुजली जातील.

२) भारतीय सैन्या वर आधारित डॉक्युमेंट्री मुवीचे प्रक्षेपण - देश कार्य आणि भारतीय सैन्या वर आधारित वर आधारित दाखवण्यात आला.



## पुण्यात गणेशोत्सवात वाहनांची तोडफोड; लष्कर आणि औंध भागात टोळक्याचा दहशतवाद

**पुणे । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या उत्साहात शहरात दहशत माजवणाऱ्या टोळक्याने वाहनांची तोडफोड केल्याच्या दोन घटना उघडकीस आल्या आहेत. लष्कर आणि औंध परिसरात घडलेल्या या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी याबाबत दोन स्वतंत्र गुन्हे दाखल केले असून तपास सुरू आहे.

लष्कर भागातील पूना कॉलेजसमोरील गल्लीत ३० ऑगस्ट रोजी रात्री टोळक्याने वाहनांची तोडफोड केली. या प्रकरणी रुद्र शिंदे, प्रथमेश, यश खरारे (रा. हरकानगर, भवानी पेठ) यांच्याविरोधात लष्कर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार महिला स्थानिक रहिवासी आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, रात्री साडेनऊच्या सुमारास आरोपींनी चित्रगुप्त अपार्टमेंट परिसरातील वाहनांची तोडफोड केली आणि पसार झाले. या प्रकरणाचा तपास सहायक फौजदार बरडे करत आहेत. दरम्यान, औंध परिसरात टेरेसा रस्त्यावर १ सप्टेंबर रोजी मध्यरात्री टोळक्याने मोटार व दुचाकींची लाकडी दांडक्याने तोडफोड केली. या घटनेनंतर आरोपी पसार झाले. चतु:शृंगी पोलीस ठाण्यात याबाबत फिर्याद नोंदवली असून तपास पोलीस उपनिरीक्षक चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. गणेशोत्सवात अशा तोडफोडीच्या घटना घडल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. शहरात गेल्या दीड वर्षांपासून वाहन तोडफोड आणि जाळपोळीच्या १५० हून अधिक घटना घडल्या आहेत. धनकवडी, भवानी पेठेतील मंजुळाबाई चाळ आणि येरवडा परिसरातही याआधी अशा प्रकारच्या घटना झाल्या होत्या.

## फटाका स्फोटाने ६ वर्षीय मुलाला गंभीर जखमा; तत्काळ उपचारामुळे दृष्टी वाचली

**पुणे । प्रतिनिधी**

लहान मुलांची उत्सुकता अनेकदा धोकादायक परिस्थिती निर्माण करू शकते, अशीच घटना पुण्यात समोर आली आहे. एका ६ वर्षीय मुलाने चुलीत फटाका ठेवून त्याचा स्फोट काय होतो हे डोकावून पाहिले, आणि काही सेकंदांतच त्याच्या गालावर, ओठांवर, पापण्यांवर खोल जखमा झाल्या. या स्फोटामुळे त्याच्या डोळ्यालाही गंभीर दुखापत झाली.

घाबरलेल्या पालकांनी मुलाला तातडीने मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दाखल केले. आपत्कालीन विभागातील वैद्यकीय पथकाने तात्काळ उपचार सुरू केले. प्लास्टिक सर्जरी विभागातील डॉक्टरांनी संपूर्ण रात्र मुलाच्या गाल, ओठ आणि पापण्यांवरील जखमा शिवल्या. मात्र, सर्वात मोठे आव्हान होते त्याच्या डोळ्याचे रक्षण करणे. नेत्रतज्ज्ञ डॉ. कीर्ती माने यांनी सांगितले की, मुलाच्या डोळ्याला गंभीर इजा झाली होती आणि नेत्रपटलापासून नेत्रभिंगापर्यंतही परिणाम पोहोचला होता. काही तासांचा विलंबही कायमस्वरूपी अंधत्वास कारणीभूत ठरू शकला असता. त्यामुळे तातडीने शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते. बालकावर आपत्कालीन नेत्रशस्त्रक्रिया करण्यात आली, त्याचा फाटलेला डोळा काळजीपूर्वक शिवला गेला आणि बरे होण्यासाठी विशेष लेन्स बसवण्यात आला. विशेष म्हणजे, फक्त २४ तासांत मुलाने डोळा उघडला आणि जवळपास ८० टक्के दृष्टी स्पष्ट झाली. केवळ दोन आठवड्यांत त्याची दृष्टी पूर्णपणे पूर्ववत झाली. डॉ. माने पुढे म्हणाल्या, उपचार करताना प्रत्येक मिनिट महत्त्वाचे होते. वेळेवर शस्त्रक्रिया आणि वैद्यकीय पथकाच्या प्रयत्नांमुळे आम्ही केवळ मुलाचा डोळाच वाचवला नाही, तर त्याची दृष्टी पूर्णपणे परत मिळवून दिली. मुलाला त्याचे हसू आणि दृष्टी पुन्हा मिळवून देण्यात यशस्वी झालो याचे आम्हाला समाधान आहे. या घटनेमुळे फटाक्यांमुळे होणाऱ्या अपघातांचे धोक्याचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे.

## पुण्यातील आरोग्यसेवा ठप्प; १,४०० एनएचएम कर्मचाऱ्यांचा संप दोन आठवड्यांपासून सुरू

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) चे १,४०० हून अधिक कर्मचारी आणि अधिकारी गेल्या दोन आठवड्यांपासून संपावर असल्यामुळे पुण्यातील आरोग्य सेवा गंभीर संकटात आहे. सरकारी रुग्णालयांमध्ये मुलांसाठी लसीकरण, प्रसूतीपूर्व काळजी, नवजात शिशु अतिदक्षता विभाग, शस्त्रक्रियागृह तसेच क्षयरोग, कुष्ठरोग, मधुमेह, कर्करोग आणि उच्च रक्तदाब तपासणीचे काम मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले आहे.



एनएचएम कर्मचाऱ्यांमध्ये नर्सेस, फार्मासिस्ट, तंत्रज्ञ, लिपिक, डेटा एन्ट्री ऑपरेटर, डॉक्टर आणि प्रोग्राम मॅनेजर यांचा समावेश आहे. हे सर्व कर्मचारी एनएचएम अंतर्गत कंत्राटी आहेत, आणि ६९ कर्मचाऱ्यांचा एक विशेष कॅडर आहे ज्यामध्ये अनेकांनी १५-२० वर्षे सेवा दिली आहे. तरीही, त्यांना त्यांच्या कायमस्वरूपी समकक्षांपेक्षा ५०-६०% कमी पगार मिळतो, ज्यामुळे त्यांच्या जीवनमानात गंभीर फरक पडला आहे.

पुण्यातील नागरी रुग्णालयांमध्ये याचा तात्काळ परिणाम दिसून येतो आहे. कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे रुग्णांना लांब प्रतीक्षा करावी लागते किंवा परत पाठवावे लागते. मुलांसाठी नियमित लसीकरण आणि गर्भवती मातांसाठी प्रसूतीपूर्व काळजी या सेवा मोठ्या प्रमाणात बाधित झाल्या आहेत, तर दीर्घकालीन आजारांसाठी उपचारांमध्येही विलंब होत आहे. एनएचएम कर्मचाऱ्यांनी सांगितले की, २०२२ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश आणि मार्च २०२४ मध्ये दीर्घकाळ काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सरकारी सेवेत सामावून घेण्यासाठी जारी केलेल्या सरकारी ठरावानंतरही, कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे भविष्य अनिश्चित आहे आणि संप सुरू राहण्याची कारणे कायम आहेत. एनएचएम सर्वसमावेशक समिती, पुणेचे अध्यक्ष विजय गायकवाड म्हणाले, आम्ही नियमित कर्मचाऱ्यांसोबत खांद्याला खांदा लावून काम करतो, पण आमचे वेतन खूपच कमी आहे आणि आमचे भविष्य अनिश्चित आहे. जोपर्यंत सरकार आमच्या सेवांना नियमित करण्याचा आदेश देत नाही, तोपर्यंत हा संप सुरूच राहील. जर प्रशासनाने तातडीने उपाययोजना केली नाही तर पुण्यातील आधीच ओझ्याखाली दबलेली आरोग्य व्यवस्था आणखी बिकट होऊ शकते.

सध्या प्रशासनाने तरीही कोणतीही ठोस योजना जाहीर केलेली नाही, आणि रुग्ण तसेच त्यांचे कुटुंब या परिस्थितीमुळे गंभीर त्रासात आहेत.



## सार्वजनिक शौचालयातील घाणेरडे पाणी घरात शिरल्याने रहिवाशांचा संताप

**पुणे । प्रतिनिधी**

गुलटेकडी औद्योगिक वसाहतीतील ४२७ पॉवर हाऊसच्या मागे असलेले सार्वजनिक शौचालय स्थानिक रहिवाशांसाठी नुसतेच असह्य दुर्गंधीचे कारण बनले नाही, तर आता आरोग्यासाठीही गंभीर धोकादायक ठरले आहे. रहिवाशांचा आरोप आहे की, शौचालयाची योग्य देखभाल न केल्यामुळे आणि अडथळ्यांमुळे घाणेरडे पाणी घरांत शिरते आहे, ज्यामुळे कुटुंबे, विशेषतः मुले आणि वृद्धांचे आरोग्य धोक्यात येत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, या शौचालयात वीजपुरवठा नाही आणि वाहत्या पाण्याची व्यवस्था अपुरी आहे. पुणे महानगरपालिकेच्या (पीएमसी) बिबवेवाडी वॉर्ड कार्यालयाकडे वारंवार तक्रारी केल्या असतानाही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

**रहिवाशांचा संताप**

स्थानिक रहिवासी अनिता उजागरे म्हणाल्या, महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतरही कचरा रस्त्याच्या कडेलाच आहे. पीएमसी आयुक्तांनी दिवसा आणि रात्री दोन्ही शिफ्टमध्ये सफाई कर्मचाऱ्यांना तैनात करण्याचे आदेश दिले होते, तरीही बिबवेवाडी वॉर्ड अधिकारी या आदेशांकडे दुर्लक्ष करत आहेत. घनकचरा विभागाला नवीन वाहने मिळाली असूनही परिस्थिती सुधारलेली नाही.

**स्वच्छतेचे अपयश**



सामाजिक कार्यकर्ते मेहबूब लांडगे म्हणाले, शौचालय पुन्हा सुरू करणे हे स्वागतार्ह पाऊल होते, परंतु स्वच्छतेचा अभाव अजूनही आहे. परिसरात असह्य दुर्गंधी पसरली आहे. पूर्वी तात्पुरत्या वायर कनेक्शनद्वारे वीजपुरवठा केला जात होता, पण आता तोही काम करत नाही. प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात.

**वर्षानुवर्षे बिघडलेले कार्य**

रहिवासी मोईन शेख म्हणाले, दुरुस्तीचे तीन प्रयत्न करूनही हे शौचालय जवळजवळ अडीच वर्षांपासून बंद आहे. घरातील मुले कचऱ्यामुळे वारंवार आजारी पडतात. शौचालय बंद असल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला आणि मुले लांब अंतर चालून जावे लागते. वॉर्ड ऑफिसने पाणी, वीज आणि सुविधांचे योग्य कामकाज सुनिश्चित करावे.

**इतर क्षेत्रांमध्येही निष्काळजीपणा**

पार्वती असेंब्ली (आरपीआय) चे सरचिटणीस बाळासाहेब शेलार यांनी अधोरेखित केले की मीनाताई ठाकरे कॉलनी आणि वाहन डेपो गल्ली क्रमांक १ येथील शौचालयाचीही अशीच अवस्था आहे. वारंवार तक्रारी करूनही, वॉर्ड अधिकारी समस्या सोडवण्याऐवजी फक्त तात्पुरत्या भेटी देतात. येथे नियुक्त आरोग्य निरीक्षक आणि पर्यवेक्षक देखील त्यांच्या कर्तव्यात दुर्लक्ष करत आहेत. यामुळे मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य धोक्यात आहे. जबाबदार अधिकाऱ्यांची जागा अधिक जबाबदार कर्मचाऱ्यांनी घ्यावी, असे शेलार यांनी म्हटले.

**सांडपाण्याचा ओव्हरफ्लो समस्या**

रहिवासी अमोल अरुण आडके म्हणाले, जवळच्या भागात दुर्गंधी आणि सांडपाणी ओव्हरफ्लो हा नेहमीचा प्रश्न बनला आहे. मीनाताई ठाकरे कॉलनी गल्ली क्रमांक १६ मध्ये ब्लॉक केलेल्या चेंबर्समुळे दूषित पाणी घरात शिरते.

## ढोले पाटील ज्युनिअर कॉलेजचा मल्हार मार्तंड कार्यक्रम उत्साहात

**पुणे । प्रतिनिधी**

ढोले पाटील गणपती मंदिर आयोजित गणेशोत्सवात ढोले पाटील ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्सच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला मल्हार मार्तंड हा सांस्कृतिक कार्यक्रम विशेष गाजला.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अभिनय, नृत्य, वेशभूषा आणि कलाकौशल्याचा सुंदर मिलाफ घडवून सर्वांना प्रभावित केले. विशेष म्हणजे, नुकतेच प्रवेश घेतलेल्या अकरावीतील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेत उत्कृष्ट कला सादर केली व कार्यक्रमाची उंची वाढवली. कार्यक्रमाच्या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन श्री. सागर ढोले पाटील सर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले, तर संस्थेच्या सेक्रेटरी सौ. उमा मॅडम यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन दिले.

या प्रसंगी संस्थेचे प्रशासकीय कर्मचारी, विविध विभाग प्रमुख तसेच प्राध्यापक उपस्थित होते. समारोपाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. विठ्ठल गायकवाड यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सर्वांचे आभार मानले

